# पुणे महानगरपालिका
# मुख्यलेखा व वित्त विभाग
# जाहीर प्रकटन

पुणे महानगरपालिका, मुख्य लेखा व वित्त विभाग, मुख्य इमारत शिवाजीनगर, पुणे ५ विभागाकरिता ६ महिने मुदतीकरिता एकवट मानधन तत्त्वानुसार करार पद्धतीने सॅप फॅसिलीटेटर या पदाची नेमणूक करण्यात येणार आहे. उमेदवारांनी सर्व मूळ कागदपत्रांसह व साक्षांकित प्रतींसह कॅप्टन वडके सभागृह, तिसरा मजला, मुख्य इमारत, शिवाजीनगर, पुणे-४११००५ येथे घेण्यात येईल. वरील पदांसाठी मुलाखत बुधवार, दिनांक २८/०३/२०१८ दिवशी सकाळी ११.०० वाजता वेळेत समक्ष भेटावे.

पदासाठी पात्रता खालीलप्रमाणे :

| | पदांची संख्या | ०२ |
|---|---|---|
| १. | शैक्षणिक पात्रता | सी.ए. किंवा सी.एम.ए. चे सभासदत्व |
| २. | अनुभव | १) सी.ए. किंवा सी.एम.ए.चे सभासदत्वानंतरचा किमान ३ वर्षांचा अकौंटमधील (लेखे व लेख्यांचे अंतिमीकरणाचा) अनुभव.<br>२) सॅप इम्पिलमेंटेशन कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| ३. | एकवट मानधन | ५०,०००/- |

**अटी व शर्ती :**

अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व अनुभवाच्या दाखल्याची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने अर्जावर स्वतःचा एक पासपोर्ट साईज फोटो लावावा.

१. विहित पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, अपूर्ण वा चुकीचे भरलेले अर्ज, वय, शैक्षणिक/व्यावसायिक अर्हता तसेच फोटो नसलेले, अर्जावर स्वाक्षरी नसलेले, खाडाखोड केलेले, विसंगत माहिती असलेले अर्ज अपात्र समजले जातील. अपात्र ठरलेल्या अर्जांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

२. वरील पदांवरील नेमणुका दरमहा एकवट वेतनावर करार पद्धतीने व सहा महिने तात्पुरत्या कालावधीसाठी केल्या जातील. त्यानंतर करार संपुष्टात येईल.

३. रिक्त पदांच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलावण्यात येईल.

४. मुलाखतीस बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

५. महानगरपालिकेमध्ये अशा स्वरुपाच्या कामाचा अनुभव असल्यास प्राधान्याने विचार केला जाईल.

६. मुलाखतीस बोलावण्याचे अंतिम अधिकार मा. महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवले आहेत.

७. **वरील पदांसाठी मुलाखत बुधवार, दि. २८/०३/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता कॅप्टन वडके सभागृह, तिसरा मजला, पुणे महानगरपालिका भवन, शिवाजीनगर, पुणे ४११००५ येथे घेण्यात येईल. संपर्क श्री. महेंद्र जाधव, दूरध्वनी क्र. ०२०-२५५०१०५३**

८. सदर नियुक्त्या करार पद्धतीने होणार असल्याने निवड झालेल्या उमेदवारांना मनपाच्या आस्थापनेवरील कोणत्याही पदावर नियुक्तीकरिता हक्क सांगता येणार नाही. तसेच मनपा कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले कोणतेही लाभ मिळणेस ते पात्र ठरणार नाही.

स्वाक्षरी/-

उल्का कळसकर

मुख्यलेखा व वित्त अधिकारी

पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/९६३, दि. १९/०३/२०१८